पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ● वर्ष १६ ● अंक ४१ ●सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

"चांगले पुस्तक म्हणजे मानवी आत्म्याचे अतिशुद्ध सार असते."




# पहिल्या श्रावण सोमवारी उत्साह, भक्ती आणि विश्वासाची कावडयात्रा!

## पूर्णा मातेच्या जलाने राजराजेश्वराला जलाभिषेक

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अकोला :** पहिल्याच श्रावण सोमवारी अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर मंदिरात भक्तांचा अथांग जनसागर उसळला आहे. 'हर हर महादेव' आणि 'बम बम भोले' च्या गजराने संपूर्ण अकोला नगरी शिवमय झाली आहे. श्रावणाच्या पहिल्याच दिवशी महादेवाला जलाभिषेक करण्यासाठी हजारो कावड आणि पालखी धारकांनी रविवारी रात्रीपासूनच अकोल्याजवळील गांधीग्राम येथील पूर्णा नदीच्या पात्रात गर्दी केली होती. गांधीग्राम येथून पवित्र जल कावडीत भरून भक्तांनी तब्बल १८ किलोमीटरची खडतर पायपीट करत अकोला गाठले. हातात कावड, शिस्तबद्ध रांगा आणि अंगात भरलेला अभूतपूर्व उत्साह यांच्या बळावर



कावडधारकांनी ही वाटचाल पूर्ण करून राजराजेश्वराला जलाभिषेक केला. राजराजेश्वर मंदिरात रविवारी मध्यरात्रीपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामध्ये मातृशक्तीचा सहभाग उल्लेखनीय होता. हजारो महिला भाविकांनी रात्रीपासूनच मंदिरात उपस्थित राहून शंभो शंकराचे भावपूर्ण दर्शन घेतले. पहिल्याच सोमवारी अकोलेकरांनी आणि दूरवरून आलेल्या भक्तांनी संपूर्ण मंदिर परिसर व्यापून टाकला होता. मराठी भाषिकांच्या या पहिल्या श्रावण सोमवारी भक्तीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. महादेवाचे आवडते बिल्वपत्र (बेलपत्र), दुग्धाभिषेक आणि पूर्णेच्या पवित्र जलाने जलाभिषेक करत भाविकांनी भगवान शिवशंकराच्या चरणी आपल्या मनोकामना पूर्ण करण्याचे साकडे घातले. गांधीग्राम येथील पूर्णा नदीच्या पात्रात आणि रस्त्यावर भक्तांची गर्दी वाढल्याची दखल घेत प्रशासनाने रात्रीतूनच चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला. कावड यात्रा आणि दर्शनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष काळजी घेण्यात आली.

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक रात्रीतून गांधीग्राम येथे दाखल झाले होते. पहिल्याच श्रावण सोमवारी अकोल्यात दिसून आलेला हा भक्तीचा ध्यास, कावडधारकांचा उत्साह आणि शिवशंकराप्रती असलेली निष्ठा यामुळे संपूर्ण शहर अध्यात्मिक आणि धार्मिक ऊर्जेने उजळून निघाले आहे.





देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे भेट घेत विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. पक्ष पातळीवर राजकीय बदलाची शक्यता व्यक्त होत आहे.

# जो मराठ्यांच्या लेकी-बाळींवर बोलेल!

## जरांगे पाटीलांचा इशारा; वाघमारेंचे वादग्रस्त विधान

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

छत्रपती संभाजीनगर : ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी केलेल्या वादग्रस्त विधानानंतर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा पारा चांगलाच चढला आहे. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत जरांगे यांनी नवनाथ वाघमारे यांच्या वक्तव्याचा खरपूस शब्दांत समाचार घेतला आहे. जो मराठ्यांच्या लेकी-बाळींवर बोलेल, त्याला यापुढे कोणालाही सुट्टी नाही, असा थेट इशारा देत जरांगे यांनी २९ ऑगस्टपासून राज्य सरकारविरोधात आक्रमक आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. नवनाथ वाघमारे यांनी 'पैसा आणि गोंडस मुलं पाहून मराठा समाजातील मुली ओबीसींच्या घरात घुसतात', असे वादग्रस्त विधान केले होते.

**CLASSIFIED**

**शेती विकणे आहे**

मौजा चांदूर, ता.जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2 आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.

संपर्क : शरदचंद्र नेवास्कर
मो. नं.- 9822702276





















सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## स्वातंत्र्य दिनाचा उत्सव विद्यार्थ्यांसोबत मौलाना आझाद विचार मंचतर्फे मिठाई वाटप

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**पुसद :** स्वातंत्र्य दिनाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मौलाना आझाद विचार मंचतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. नगर परिषद कार्यालयासमोर झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना यावेळी अभिवादन करण्यात आले. देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजावीत, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. मिठाईचे वाटप होताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. स्वातंत्र्याचा अभिमान आणि देशभक्तीच्या भावनेने कार्यक्रमाला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले. यावेळी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव सय्यद इश्तियाक, नगरसेवक ॲड. वसीम अहमद, नगरसेवक फिरोज खान, नगरसेवक जब्बार लाखे, नगरसेवक नेमायते, बबलू चव्हाण, फारूक चव्हाण, बनचरे मामा, अब्दुल रहेमान चव्हाण यांच्यासह अनेक देशप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थी कमी, शिक्षक अधिक; मंत्र्यांनी आश्रमशाळा प्रशासनाला सुनावले

### कापरा, हिवरी आश्रमशाळांची अचानक तपासणी : मुख्याध्यापक, शिक्षकांच्या बदल्यांचे निर्देश

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**यवतमाळ :** आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी कापरा आणि हिवरी येथील शासकीय आश्रमशाळांना अचानक भेट देत शाळेतील विद्यार्थी संख्या आणि उपलब्ध सुविधांची पाहणी केली. शिक्षकांची संख्या पुरेशी असतानाही विद्यार्थी प्रवेश कमी असल्याचे आढळल्याने त्यांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.



कापरा येथील आश्रमशाळेत पहिली ते बारावीपर्यंतचे वर्ग असून शाळेची मोठी इमारत, वसतिगृह आणि अन्य सुविधा उपलब्ध आहेत. दहा शिक्षक कार्यरत असतानाही विद्यार्थी संख्या अपेक्षेप्रमाणे नसल्याचे मंत्र्यांच्या निदर्शनास आले. विशेषतः दहावी ते बारावीच्या वर्गांमध्ये नवीन प्रवेशाचे प्रमाण कमी असल्याने त्यांनी मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न न करणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांच्या बदल्यांचे निर्देश मंत्री उईके यांनी प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे यांना दिले. शाळा प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेऊन आवश्यक ती कडक कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मंत्री उईके यांनी मुलींचे वसतिगृह, भोजनालय, स्वयंपाकगृह, वैद्यकीय कक्ष आणि शाळा परिसराची पाहणी केली. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांबाबत त्यांनी संबंधितांकडून माहिती घेतली.

हिवरी येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेलाही त्यांनी भेट दिली. वसतिगृहाची पाहणी केल्यानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि शाळेतील सुविधांबाबत माहिती घेतली. विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील ध्येयाबाबत मार्गदर्शनही केले. आश्रमशाळांमधील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी पालकांशी थेट संवाद साधण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले. पालकांना विश्वासात घेऊन नियमित पालकसभा आयोजित करावी आणि अधिकाधिक विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

## बनावट मद्यसाठ्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची धाड

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**यवतमाळ :** स्वातंत्र्यदिनानिमित्त मद्यविक्रीसाठी 'कोरडा दिवस' असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाने यवतमाळ शहरात दोन ठिकाणी धाड टाकून गोवा राज्य निर्मित मद्याच्या बाटल्यांवर महाराष्ट्रातील ब्रँडची बनावट लेबले लावलेला मद्यसाठा जप्त केला. या कारवाईत एकूण १ लाख ३५ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका संशयिताला अटक करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे यवतमाळ बिट क्रमांक २ चे दुय्यम निरीक्षक आर. के. तायकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. सुर्योदय सोसायटी, भोसा रोड येथील धनराज अशोक यादव (४०) तसेच श्रीराम टॉवर्स, मामा नगरी, लोहारा येथील अतिकेश विजय पवार यांच्या



ठिकाणी धाड टाकण्यात आली.

कारवाईत गोवा राज्य निर्मित रॉयल स्टॅगच्या १८० मिली क्षमतेच्या २५२ बाटल्या आढळून आल्या. या बाटल्यांवर महाराष्ट्रात निर्मित रॉयल स्टॅगच्या ब्रँडची बनावट लेबले लावण्यात आली होती. तसेच इम्पिरियल ब्ल्यूच्या ११७ बाटल्या आढळल्या. त्यावरही महाराष्ट्र निर्मित मद्याच्या बनावट लेबलांचा वापर करण्यात आला होता. याशिवाय महाराष्ट्र निर्मित मास्टर डिलाईटच्या १८० मिली क्षमतेच्या १०१ कंपनी सीलबंद बाटल्या आणि एक झायोमी कंपनीचा मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ मधील कलम ६५ (ई), (डी), ८१, ८३, ९० व १०८ अन्वये गुन्हा क्रमांक २९७/२०२६ दाखल करण्यात आला आहे. धनराज यादव याला अटक करण्यात आली असून अतिकेश पवार हा फरार असल्याचे विभागाने सांगितले.

विभागीय उपआयुक्त डॉ. पराग नवलकर व अधीक्षक प्रमोद सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. निरीक्षक एस. व्ही. बोधे यांच्यासह दुय्यम निरीक्षक डी. एच. त्रिपाठी, डी. डी. वल्के, ए. बी. पेंदोर आणि जवानांनी कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास आर. के. तायकर करीत आहेत.

दरम्यान, मध्य प्रदेश व गोवा राज्यातून बनावट देशी-विदेशी मद्याची निर्मिती, विक्री किंवा वाहतुकीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००८३३३३३३ किंवा व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तीन जबरी चोरीचे गुन्हे उघड; सोन्याचे दागिने जप्त

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**यवतमाळ :** यवतमाळ शहरासह परिसरात झालेल्या जबरी चोरीच्या तीन गुन्ह्यांचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून १५.९८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण १ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सोन्याच्या सध्याच्या बाजारभावानुसार जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे २ लाख २५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.



अवधूतवाडी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आरोपी परमेश्वर ऊर्फ प्रमोद सुनील राठोड हा साथीदारासह सोन्याचे दागिने विक्री करण्यासाठी यवतमाळ बसस्थानक चौकात येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले.

परमेश्वर ऊर्फ प्रमोद सुनील राठोड (२५, रा. सिंदखेड, ता. नेर) आणि राजेश पुंडलिक मोरे (२५, रा. अशोकनगर, नेर) अशी आरोपींची नावे आहेत. अंगझडतीमध्ये पोलिसांना सोन्याचे दागिने आढळून आले. या दागिन्यांचे वजन सुमारे १५.९८ ग्रॅम असून त्यांची किंमत १ लाख १३ हजार रुपये आहे. याशिवाय गुन्ह्यासाठी वापरलेली काळ्या रंगाची हिरो कंपनीची दुचाकीही जप्त करण्यात आली. पोलिसांच्या चौकशीत आरोपींकडून अवधूतवाडी, यवतमाळ शहर आणि यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यांत दाखल असलेले प्रत्येकी एक असे तीन जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

१२ ऑगस्ट रोजी पारवा येथील शेतातील गोठ्यात एका महिलेच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने हिसकावून नेल्याच्या गुन्ह्याचाही या तपासात उलगडा झाला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चव्हरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक मनीष गावंडे, सहायक पोलिस निरीक्षक गजानन राजमल्लू, पोलिस उपनिरीक्षक सागर इंगळे व त्यांच्या पथकाने केली.

## पाटण, मार्की व पांढरकवडा प्रकल्पातील आश्रमशाळांची सुरक्षा तपासणी करा

### गडचिरोलीतील सर्पदंशाच्या घटनेनंतर मागणी

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**झरी-जामणी :** गडचिरोली जिल्ह्यात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा सर्पदंशामुळे मृत्यू झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर झरी-जामणी तालुक्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पाटण व मार्की येथील अनुदानित आश्रमशाळांसह पांढरकवडा प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची तातडीने सुरक्षा तपासणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आदिवासी सामाजिक संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पावसाळ्यात आश्रमशाळांच्या परिसरात साप, विंचू व इतर विषारी प्राणी येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे परिसरातील झाडेझुडपे व गवत साफ करणे, निवासगृह, स्वयंपाकगृह व शौचालयांची नियमित स्वच्छता, पुरेशी प्रकाश व्यवस्था तसेच दरवाजे-खिडक्यांची सुरक्षितता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.



सर्पदंशाच्या घटना घडल्यास विद्यार्थ्यांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयांशी समन्वय साधून आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्था निश्चित करावी. विद्यार्थ्यांसह कर्मचाऱ्यांना सर्पदंशाच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीचे प्रशिक्षण देऊन प्रत्येक आश्रमशाळेत आपत्कालीन संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावावेत, अशी मागणीही करण्यात आली.

गडचिरोलीतील घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित आश्रमशाळांची सखोल चौकशी करून राज्यातील अनुदानित आश्रमशाळांचे स्वतंत्र सुरक्षा व सुविधा परीक्षण करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना पाठविण्यात आल्या. हे निवेदन तहसीलदार, झरी-जामणी यांच्यामार्फत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी पांडूरंग पोयाम, दयाकर गेडाम, महेश गेडाम, योगेश मडावी, गंगाधर आत्राम, अमोल मंचलवार, मारोती कुसराम, सुभाष आत्राम, भीमराव आत्राम, पवन नैताम, माधव आत्राम व नानाभाऊ कोडापे यांच्यासह विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शेंबाळपिंपरीतून १२ भाविक उमरा यात्रेसाठी रवाना

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**शेंबाळपिंपरी :** शहर काजी तथा जामा मस्जिदचे इमाम आणि मदरसा रिजविया मुनीरिया संस्थेचे संस्थापक सचिव मुफ्ती मोहम्मद शफीकोद्दीन रफीकोद्दीन सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली शेंबाळपिंपरी येथील मुस्लिम समाजातील आठ पुरुष आणि चार महिला अशा १२ भाविकांना उमरा यात्रेसाठी उत्साहपूर्ण वातावरणात रवाना करण्यात आले.



जोहरची नमाज अदा केल्यानंतर जामा मस्जिद परिसरात निरोप समारंभ झाला. मक्का मुकर्रमा शरीफ, मदीना मुनव्वरा शरीफ यासह पवित्र स्थळांच्या दर्शनासाठी भाविक रवाना झाले.

या यात्रेत मुफ्ती मोहम्मद शफीकोद्दीन रफीकोद्दीन सिद्दीकी, मशीरोदीन निजामोदीन सिद्दीकी, रोशन ट्रेडिंग कंपनीचे मालक मुनीरोदीन हाजी करीमोदीन सिद्दीकी, शेख मुनीर शेख बशीर, ठेकेदार महेमुद मशीरोदीन सिद्दीकी, शेख अबरार शेख मुनीर, युवा उद्योजक वसीमोदीन मुनीरोदीन सिद्दीकी आणि नाईक कृषी केंद्राचे मालक सज्जाद नाईक हाजी सादीक नाईक यांच्यासह चार महिला सहभागी झाल्या आहेत.

कळमनुरी येथील नुरी बाबा हज अँड उमरा टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून यात्रेचे आयोजन करण्यात आले. जामा मस्जिद कमिटीचे अध्यक्ष जैनुलआबेद्दीन सिद्दीकी, कमिटी सदस्य, माजी पदाधिकारी तसेच नमाज बांधवांच्या वतीने भाविकांचा शाल, अत्तर आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी गावासह राज्य आणि देशात शांतता, बंधुता व सर्वधर्मीय सलोखा नांदावा, यासाठी सामूहिक दुआ करण्यात आली. त्यानंतर जामा मस्जिदपासून बसस्थानकापर्यंत मुस्लिम समाजासह इतर समाजबांधवांनी पायी सहभागी होत भाविकांना निरोप दिला.

ग्रामपंचायत कार्यालयासमोर सरपंच रवींद्र महल्ले तसेच व्यापारी संकुलातील व्यापाऱ्यांनी भाविकांचे शाल व पुष्पहार देऊन स्वागत केले. या निरोप सोहळ्यामुळे संपूर्ण गावात भक्तिमय, सौहार्दपूर्ण आणि भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

## जिव्हाळा संस्थेचा 'उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार-२०२६'ने सन्मान

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**उमरखेड :** स्वातंत्र्यदिनानिमित्त यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयात जिव्हाळा संस्थेला महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार–२०२६' प्रदान करण्यात आला. पालकमंत्री संजय दुलीचंद राठोड यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अतुल लताताई राम मादावार यांनी पुरस्कार स्वीकारला.

यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, निवासी जिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, आमदार दुष्यंत चतुर्वेदी आणि यवतमाळ नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांच्यासह अधिकारी, लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते.



मागील १५ वर्षांपासून जिव्हाळा संस्था ग्रामीण व वंचित घटकांच्या विकासासाठी कार्यरत आहे. महिला व बाल सक्षमीकरण, युवक विकास, शिक्षण, आरोग्य, पोषण, कौशल्य विकास, रोजगार, उपजीविका, आर्थिक साक्षरता, जलसंधारण, कृषी, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन क्षेत्रात संस्थेने उल्लेखनीय कार्य केले आहे.

नैसर्गिक आपत्तीच्या काळात संस्थेने प्रशासनाच्या समन्वयाने पूरग्रस्त हजारो कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य, आरोग्य व स्वच्छतेसाठी मदत केली. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील नववी ते बारावीच्या २२५ मुलींना सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शैक्षणिक शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिली.

"हा पुरस्कार संस्थेसोबत निःस्वार्थपणे कार्य करणारे कार्यकर्ते, स्वयंसेवक, लाभार्थी आणि समाजातील सहृदय व्यक्तींच्या योगदानाचा गौरव आहे," अशी भावना अध्यक्ष अतुल लताताई राम मादावार यांनी व्यक्त केली.

या सोहळ्यास धनराज राऊत, गजानन श्रीरामांजवार, रुद्राक्ष मादावार आणि रोहित अलमुलवार उपस्थित होते. संस्थेच्या सन्मानाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## नगरसेवक रियाज सय्यद यांचा 'पूर योद्धा' म्हणून गौरव

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**आर्णी :** संकटाच्या काळात नागरिकांच्या मदतीसाठी स्वतः पुराच्या पाण्यात उतरून सहा नागरिकांचे प्राण वाचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे आर्णीचे नगरसेवक रियाज सय्यद यांचा स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रशासनाच्या वतीने 'पूर योद्धा' म्हणून गौरव करण्यात आला.

दि. ३० जुलै रोजी आर्णी शहरात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत प्रकाश नगर परिसरातील सहा नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून रियाज सय्यद यांनी प्रसंगावधान राखत बचावकार्यात सहभाग घेतला. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

त्यांच्या या धाडसी आणि सेवाभावी कार्याची प्रशासनाने दखल घेतली. स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांच्या हस्ते रियाज सय्यद यांना प्रशस्तीपत्र देऊन 'पूर योद्धा' म्हणून सन्मानित करण्यात आले.

सन्मानानंतर भावना व्यक्त करताना रियाज सय्यद म्हणाले, "हा सन्मान माझ्यासाठी केवळ पुरस्कार नाही, तर संकटाच्या काळात जनतेच्या पाठीशी उभे राहण्याची नवी जबाबदारी आणि प्रेरणा आहे. नागरिकांच्या अडचणीच्या काळात त्यांना मदतीचा हात देणे हे माझे कर्तव्य आहे."

## कोटपा कायद्यान्वये ३८० कारवाया, २५७ पानटपऱ्या हटवल्या

### शाळा-महाविद्यालयांभोवती पोलिसांची धडक

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**यवतमाळ :** शाळा-महाविद्यालयांच्या परिसराला तंबाखू आणि अमली पदार्थांपासून मुक्त करण्यासाठी यवतमाळ जिल्हा पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेला चांगलेच बळ मिळाले आहे. १ जुलै ते १३ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात आलेल्या मोहिमेत कोटपा कायद्यान्वये ३८० कारवाया करण्यात आल्या. तसेच २५७ पानटपऱ्या हटविण्यात आल्या असून ९८४ शाळा-महाविद्यालये तंबाखूमुक्त व नशामुक्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. शैक्षणिक संस्थांच्या परिसरातील दुकाने, पानटपऱ्या आणि अन्य ठिकाणी पोलिसांच्या पथकांनी तपासणी केली. तंबाखूजन्य पदार्थांची विक्री तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर संबंधित कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली. केवळ कारवाईपुरते मर्यादित न राहता विद्यार्थी व्यसनांपासून दूर राहावेत यासाठी पोलिसांकडून जनजागृती, समुपदेशन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देण्यात आला.

**कारवाईला यापुढेही वेग**

- शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थ किंवा अमली पदार्थांची विक्री अथवा सेवन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही सातत्याने कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**नागरिकांनी पुढाकार घ्यावा**

- 'नशामुक्त युवा–सुरक्षित समाज' या संकल्पनेनुसार पालक, शिक्षक, विद्यार्थी, दुकानदार आणि नागरिकांनी पोलिसांच्या मोहिमेला सहकार्य करावे आणि शैक्षणिक परिसर नशामुक्त व तंबाखूमुक्त ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी केले आहे.

## 'स्कूल ठीक करो' अभियानातून शाळांच्या समस्यांवर आवाज उठविणार

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**यवतमाळ :** शाळांमधील मूलभूत सुविधांचा अभाव आणि शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीने 'स्कूल ठीक करो' अभियान सुरू केले आहे. जंतर-मंतर येथील आंदोलनानंतर पक्षाने आता गावपातळीवर अभियान राबविण्याचा निर्णय घेतला असून, यवतमाळ जिल्ह्यातील युवकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात येत आहे. याअनुषंगाने यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत युवकांची बैठक झाली. अभियानाचे समन्वयक प्रकाश भिसे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी युवकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

यवतमाळ जिल्ह्यात दुष्काळ, शेतकरी आत्महत्या आणि बेरोजगारीचे प्रश्न गंभीर आहेत. रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे युवकांसमोर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत शिक्षणाच्या माध्यमातून युवकांना सक्षम करणे आवश्यक आहे. मात्र, शाळांमधील अपुऱ्या सुविधा आणि शैक्षणिक समस्यांकडेही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. 'स्कूल ठीक करो' अभियानांतर्गत जिल्ह्यातील विविध शाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील परिस्थितीची पाहणी करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या, शाळांमधील सुविधांची कमतरता तसेच इतर अडचणींची माहिती घेऊन संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा केला जाणार आहे.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

**जाहिर नोटीस**

एम.आर.सी. ८१/322/२०२६
तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक 10/08/2026

**आवेदक -** श्री.सौ./ जमिशीरोद्दिन मैनोद्दीन मुल्ला रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद जि. यवतमाळ

**अनावेदक -** मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद /सचिव, ग्राम पंचायत, शेंबाळपिंपरी ता. पुसद जि. यवतमाळ

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सौ जमिशीरोहिन मैनोद्दीन मुल्ला पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुलगी नामे श्री/सी/श्रीमती सुनेराबी जमशीरोद्दिन सिद्दिकी रा शेंबाळपिंपरी यांच्या जन्माची नोंद न्यायालयात जन्म / मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम १३ (३) प्रमाणे दिनांक 10/05/1990 रोजी त्यांच्या जन्म त्यांचे राहत्या घरी मौजा शेंबाळपिंपरी ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत यांच्या जन्माची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद /सचिव, ग्रामपंचायत शेंबाळपिंपरी पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता दि. 26/05/2026 रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर. सी. ८१/ 322 /२०२६ तहसिल कार्यालय, पुसद च्या वतीने मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद / सचिव, ग्रामपंचायत शेंबाळपिंपरी यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे, श्री. जमिशीरोद्दिन मैनोद्दीन मुल्ला रा. शेंबाळपिंपरी स्वतः आई/ मुलगा/ मुलगी / वडील / भाऊ बहिण/पूतण्या/आजोबा नामे श्री. सौ. सुनेराबी जमशीरोद्दिन सिद्दिकी रा शेंबाळपिंपरी ता. पुसद यांच्या जन्माची नोंदणी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वतः हजर अगर आपले वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहीत धरुन सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक 10/08/2026 रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पुसद**

# बनावट सोन्याची 3 किलो 300 ग्रॅम नाणी देऊन 15 लाखांची फसवणूक

## आरोपीकडून 80 हजारांची रोकड जप्त

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**पातूर :** सोन्याच्या नाण्यांचा माठ सापडल्याचे सांगून एका व्यक्तीचा विश्वास संपादन करत तब्बल 15 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पातूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत उघडकीस आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी एका आरोपीला वाशिम कारागृहातून प्रॉडक्शन वॉरंटद्वारे ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून फसवणुकीच्या रकमेशी संबंधित 80 हजार रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत.

पातूर पोलीस स्टेशनमध्ये याप्रकरणी अप. क्र. 342/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 318(4), 3(5) अंतर्गत गुन्हा दाखल आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी युवराज कांबळे, रा. वडगणे, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांना आरोपींनी त्यांच्या घरामध्ये सोन्याच्या नाण्यांचा माठ सापडला असून, सदर नाणी विकायची असल्याचे सांगितले. विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी प्रथम फिर्यादीला एक असली सोन्याचे नाणे दाखवले. त्यानंतर त्यांच्याकडे अशाच प्रकारची सुमारे 3 किलो 300 ग्रॅम



सोन्याची नाणी असल्याचे सांगण्यात आले.

यानंतर फिर्यादीला कोल्हापूरहून पातूर घाट परिसरातील नांदखेड फाटा येथे बोलावून घेण्यात आले. तेथे आरोपींनी 3 किलो 300 ग्रॅम वजनाचे बनावट सोन्याचे कॉईन फिर्यादीच्या ताब्यात देत त्याबदल्यात 15 लाख रुपये रोख घेतले आणि घटनास्थळावरून पसार झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पातूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपी विनोद मच्छिंद्र चव्हाण, रा. डव्हा, ता. मालेगाव, जि. वाशिम हा अन्य एका प्रकरणात वाशिम कारागृहात न्यायालयीन कोठडीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पातूर येथील गुन्ह्यात त्याचा तपास आवश्यक असल्याने न्यायालयाची परवानगी घेऊन प्रॉडक्शन वॉरंटद्वारे त्याला वाशिम कारागृहातून ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी केलेल्या तपासात आरोपीने गुन्ह्यातील सहभागाबाबत माहिती दिल्याचे सांगण्यात आले. तसेच मुख्य आरोपी नारायण सिताराम पवार, रा. आंत्रज, ता. खामगाव, जि. बुलढाणा याच्यासह आणखी एका व्यक्तीच्या सहभागाबाबतही माहिती मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले.

तपासादरम्यान आरोपीकडून फसवणुकीच्या रकमेशी संबंधित 80 हजार रुपये रोख रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे. आरोपीला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर आणि पातूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुहास गोसावी तसेच पोलीस अंमलदार दाऊद शेख, उमेश सांगळे, योगेश मुळवंडे आणि इस्माईल मुल्ला यांनी केली.

# सुंदर सहलीने सुखावले कर्णबधिर शाळेचे विद्यार्थी

## चिखलगाव येथील राजदीप फार्मला विद्यार्थ्यांनी दिली भेट

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अकोला:** भारताचा 80 वा स्वातंत्र्य दिन संपूर्ण देश भरात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला अकोला शहरात सुद्धा स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शहरातील एकविरा मल्टीपर्पज फाउंडेशन अकोला द्वारा संचालित कर्णबधिर बाल विकास केंद्र श्रवण वाचा भाषा प्रशिक्षण पालक मार्गदर्शन व समुपदेशन बाल विकास कर्णबधिर विशेष शाळेत सुद्धा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेतील 50 हून अधिक विद्यार्थ्यांसाठी विशेष सहलीचे आयोजन करण्यात आले होते शहरापासून नजीक असलेल्या चिखलगाव येथील सुंदर अशा राजदीप फॉर्म ला विद्यार्थ्यांनी भेट दिली या सहलीत विद्यार्थ्यांचे पालक सुद्धा सहभागी झाले होते राजदिप फॉर्म येथील निसर्गरम्य वातावरण सुंदर फळबाग, गाईचा



गोठा, हिरवीगार पिके, सुंदर फार्म हाऊस पाहून विद्यार्थी सुखावून गेले. त्याप्रसंगी एकविरा मल्टीपर्पज फाउंडेशनच्या संस्थापिका सौ सुचिता बनसोड मॅडम, श्रीकांत बनसोड राजदिप फॉर्म चे संचालक तुषार जायले, पंकज जायले मानव इंजिनिअरिंग कॉलेजचे मनोज महाजन सर उद्योग समूहाचे राम इंगळे साहेब श्रद्धासागर अकोटचे विश्वस्त अवि गावंडे आयटीआय कॉलेजचे मंगेश पुंडकर सर सविताताई जायले जिजाऊ ब्रिगेडच्या जया जायले निशा जायले दिप जायले तसेच माजी तहसीलदार अशोक अमानकर साहेब आधी उपस्थित होते राजदिप फॉर्म चे संचालक तुषार जायले व पंकज जायले यांच्यातर्फे सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. मान्यवरांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना देशभक्तीपर मार्गदर्शन केले. संपूर्ण फार्म हाऊस पाहिल्यानंतर, आणि विविध खेळांचा आनंद घेतल्यानंतर दमून भागून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी सुग्रास जेवणाचा आनंद घेतला. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात एकविरा मल्टीपर्पज फाउंडेशनच्या कर्णबधिर बाल शाळेची सहल अत्यंत उत्साहात पार पडली पुढच्या वर्षी सुद्धा अशाच सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करावे अशी मागणी यावेळी विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांनी शाळेच्या व्यवस्थापकांकडे केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राजदीप फार्मचे व्यवस्थापक खेमचद बेलाणी यांनी केले.

## राष्ट्रध्वजाला मानवंदना

**अकोला :** भारतीय माजी सैनिक संघटना, जिल्हा अकोलाच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त शनिवार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता, संघटनेच्या कार्यालयात (सिंधी कॅम्प, पाटील दूध डेअरी जवळ, अकोला) राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात येईल. या कार्यक्रमाचे आयोजन संघटनेचे अध्यक्ष सुभेदार विष्णू डोंगरे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे. या प्रसंगी जिल्ह्यातील आजी-माजी सैनिक, वीर माता, वीर पिता, वीर पत्नी तसेच देशभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राष्ट्रध्वजाला मानवंदना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 80 वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**बाळापूर :** येथील ऐतिहासिक जयस्तंभावर स्वातंत्र्य दिनाच्या 80 वा वर्धापनदिनी आमदार नितीन बापू देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. बाळापुरचे नगराध्यक्ष डॉ. अप्रिल परवीन मोहम्मद जमीन यांच्यासह बाळापुर नगर परिषदेचे सर्व सदस्य, गावातील शांतता समितीचे सर्व सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, माता-भगिनी मोठ्या संख्येने ध्वजारोहण समारंभाला उपस्थित होते. याचबरोबर सर्व शासकीय शाळा शासकीय कर्मचारी भवन या ठिकाणी ध्वजारोहण उत्साहात साजरे झाले 80 व्या वर्धापन दिनाचे निमित्त साधून गावातील विद्यार्थी व नागरिक बंधूंनी 101 मीटरचा भव्य तिरंगा रॅली काढून यापूर्वीच अभिवादन साजरा केला याप्रसंगी विद्यार्थी व नागरिक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# हिवरखेड पोलिसांनी केली अंमली पदार्थाविरुद्ध कारवाई

## अंदाजे सहा हजाराचा गांजा जप्त

**हिवरखेड :** १३ रोजी पहाटे पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली व त्यांनी घटनास्थळी चौकशी केली असता हिरव्या रंगाचे सीलबंद पाकीट आढळून आले यावरून सदर आरोपी हा गांजा विक्री करीत असल्याचे निर्देशनास आले. पोलिसांनी इंदिरा नगरातील सहारा प्लॉट मध्ये गांजा व आरोपीला ताब्यात घेतले आरोपी शेख रोशन शेख आमद अंदाजे वय ६१ वर्षे रा तिळके प्लॉट इंदिरा नगर याच्या विरुद्ध कलम ८ (क) ,२०,(ब) २(अ) आमली पदार्थाची विक्री केल्यानुसार गुन्हा दाखल केला, आरोपी कडून ४६१ ग्राम गाजा किंमत अंदाजे ६००० रुपयाचा जप्त करण्यात आला सदरची कारवाई ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी गोपाल गिलबिले, प्रवीण कुंजाम, विनोद खर्डे, रोहन बोराडे, महिला पोलीस नेहा सोनोने यांनी केली.

# सैयद मोहसीन उर्दु, हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, शिवणी येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अकोला :** यंग मुसलीम एजयुकेशन अॅन्ड सोशल वेलफेअर सोसायटी पातुर व्दारा संचालीत सैयद मोहसीन उर्दु हायस्कुल शिवणी येथे दि.१५ ऑगस्ट २०२६, शनिवार रोजी ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वज फडकवून करण्यात आला. ध्वजारोहण मुख्याध्यापक सैयद मोहीब इकबाल यांच्या हस्ते करण्यात आला

कार्यक्रमाचे अध्यक्ष सैयद मोहीब इक्बाल सैय्यद मोहसीन यांचे अध्यक्षतेखाली सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सैयद मुशरफ सैयद मुजाहीद व तसेच प्रवीन शालीकरामजी पातोडे अहेमद खान पठान सैयद निसार मो शकील असद खान गावातील प्रतीष्ठीत नागरीगक





व पालक वर्ग उपस्थित होते यावेळी इयत्ता ८ ली ते १२ वीपर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर भाषणे, गीते आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण देशभक्तीमय केले.यावेळी शाळेतील सहायक शिक्षक असीमोद्दीन यांनी विद्यार्थ्यां मार्गदर्शन केले स्वातंत्र्यदिन आपल्याला देशभक्ती, एकता आणि त्यागाची प्रेरणा देतो, देशाच्या कायद्यांचे पालन करावे आणि राष्ट्रीय एकता टिकवून ठेवावी. स्वातंत्र्यदिन हा आपल्या स्वातंत्र्याची जाणीव करून देणारा आणि देशाप्रती कर्तव्याची प्रेरणा देणारा महत्त्वाचा दिवस आहे यावेळी कार्यक्रमाचे सुत्र संचालन मोहमद अनवारादीन यानी केले आभार पर्दशन शमशेर खान यानी केले कार्यक्रम यश्सवी करण्यासाठी सर्व शिक्षक,मोहममद जाहीद अजमतुल्ला खान काजी मोइनोदीन मोहम्मद फारूख अबदुल शकुर सैयद वसीम व पालकाच्या उपस्थितीत कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाला

## धोधाणी पर्यटन स्थळावर पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**पातूर :** पातूर तालुक्यातील धोधाणी धबधबा पर्यटनस्थळी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या एका तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. मृत युवक अकोला शहरातील खैर मोहम्मद प्लॉट, शरीफ नगर परिसरातील रहिवासी असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, धोधाणी पर्यटनस्थळी पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण आपल्या मित्रांसोबत धोधाणी येथे फिरण्यासाठी आला होता. पाण्यात उतरल्यानंतर खोलीचा अंदाज न आल्याने तो खोल पाण्यात गेला आणि बुडाला. घटना लक्षात येताच स्थानिक नागरिक व संबंधित यंत्रणांनी बचावकार्य सुरू केले. तरुणाला पाण्याबाहेर काढण्यात आले; मात्र त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले.

# जसनागरा पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांच्या मनमोहक सादरीकरणाने पालक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अकोला :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा प्रथम क्रमांक प्राप्त, जसनागरा पब्लिक स्कूल येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी परिपूर्ण अशा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारी प्रदर्शनी आकर्षण केंद्र ठरली.

कार्यक्रमाला माजी न्यायमूर्ती संजय मेहरे प्रमुख अतिथी होते. शाळेचे मार्गदर्शक सिमरनजित सिंह नागरा आणि मुख्याध्यापिका सौ. अमृता कौर नागरा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमास पालकांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध मार्च पास्टने झाली. त्यानंतर जसनागरा पब्लिक स्कूलच्या हॉर्स रायडर्सनी दिमाखदार सलामी देत उपस्थितांची मने जिंकली.



विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्केटिंगच्या विविध आकर्षक कवायतींनी कार्यक्रमात विशेष रंग भरला. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट शिस्तीचे, आत्मविश्वासाचे आणि प्रशिक्षणाचे दर्शन यावेळी उपस्थितांना घडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुमधुर गायनाने पालक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. प्री-प्रायमरी मधील विद्यार्थ्यांनी इको क्लबच्या माध्यमातून पर्यावरण जनजागृतीचा संदेश देणाऱ्या विविध वेशभूषा साकारत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित केले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 'भारताची विविधतेतून एकता' या संकल्पनेवर आधारित विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी विशेष प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध राज्यांतील पारंपरिक वेशभूषा, बोलीभाषा, संस्कृती, परंपरा तसेच खाद्यसंस्कृतीचे अत्यंत सुंदर आणि अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली. या प्रदर्शनीला पालकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. अध्यक्षीय भाषणात माजी न्यायमूर्ती संजय मेहरे यांनी जसनागरा पब्लिक स्कूलच्या शिस्तीचे आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, "एवढी शिस्तप्रिय शाळा आणि कलागुणांनी संपन्न असलेले विद्यार्थी मी पहिल्यांदाच पाहत आहे." विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, त्यांचे सादरीकरण आणि शाळेने जपलेली शिस्त ही निश्चितच कौतुकास्पद आहे.मुख्याध्यापिका सौ. अमृता कौर नागरा यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या मेहनतीचे आणि सादरीकरणाचे विशेष अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांसमोर शाळेचे भविष्यातील व्हिजन मांडत, शिक्षणासोबतच क्रीडा, कला, तंत्रज्ञान, संस्कार आणि नेतृत्वगुणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्याचा शाळेचा संकल्प व्यक्त केला. शाळेचे मार्गदर्शक सिमरनजित सिंह नागरा यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



# काळाची चक्र उलटी फिरली अन...

## 33 वर्षांनी पुन्हा एकदा शाळेच्या बाकावर मनं मोकळी झाली !

**अकोला :** काळ पुढे सरकत राहतो, डोक्यावरचे केस चांदीसारखे तळपू लागतात, चेहऱ्यावर जबाबदाऱ्यांच्या सुरकुत्या उमटू लागतात... पण बालपणाच्या आठवणींना कधीच म्हातारपण येत नाही! याचाच प्रत्यय अकोल्यात आला, जेव्हा तब्बल ३३ वर्षांनंतर १९९३ च्या १०वीच्या बॅचचे वर्गमित्र पुन्हा एकदा त्याच जुन्या शाळेच्या पायऱ्या चढले. ज्या वर्गात लहानाचे मोठे झाले, त्या वर्गाच्या जुन्या लाकडी दारांना आणि बाकांना स्पर्श करताच उपस्थितांच्या डोळ्यांतून अश्रूंचे

३३ वर्षे गेली, पण मैत्रीचा धागा तुटला नाही.
शाळा सुटली, पण शाळकरीपण हरवलं नाही.
वाटा वेगळ्या झाल्या, पण मनं मात्र एकत्रच राहिली...
कारण, काही नाती वेळेसोबत जुनी होत नाहीत,
तर काळाच्या ओघात आणखी घट्ट अन् सुंदर होत जातात!

बांध फुटले. भारत विद्यालयात हा केवळ एक 'रियुनियन'चा कार्यक्रम नव्हता, तर काळाची चक्रे उलटी फिरवून पुन्हा एकदा शाळकरी विद्यार्थी होण्याचा भावूक प्रवास होता. पुन्हा लवकरच भेटू या उर्जावान शब्दांनी एकमेकांना निरोप दिला.

### शिक्षकांचा खडू ते ए.आय.चा काळ !

शिक्षकांनी रागात मारलेला खडू, त्यांच्या रागामागे लपलेलं प्रेम, मित्रांच्या नकला, बेंच वाजवून गायलेली गाणी आणि अकोल्याच्या सुप्रसिद्ध पाणीपुरीचा तोच जुना जिव्हाळा... सगळं काही जिवंत झालं. आज ए.आय. च्या युगात जगणारे हे उच्च पदस्थ मित्र, पुणे ते अकोला असा एकत्र प्रवास करताना पुन्हा एकदा १९९३ चे तेच खोडकर शाळकरी मुले बनले होते. कुणी जुन्या आठवणी सांगताना खळाळून हसले, तर कुणी वर्षानुवर्षे मनात जपलेले कलागुण गाणी अन् रिल्सच्या माध्यमातून बाहेर आणले. कोण मोठा, कोण छोटा, कुणाचा पगार किती... हा सगळा मुखवटा बाहेर काढून प्रत्येकजण फक्त आणि फक्त 'मित्र' म्हणून एकमेकांना मिठी मारत होता.

### नात्याचा धागा जपा, एक रियुनियन नक्की करा !

स्वातंत्र्य दिनी शाळेत १५ ऑगस्ट चे राष्ट्रगीताचा कार्यक्रमात सुरु झालेला रियुनियन चा सोहळ्यात प्रत्येकजण होता. दोन दिवसांचा हा सुंदर सोहळा संपताना पुन्हा एकदा ताटातूट होणार या विचाराने प्रत्येकाचे डोळे ओलावले होते. आयुष्य कितीही व्यस्त असले, तरी बालपणाच्या मित्रांना भेटणे म्हणजे थकलेल्या मनाला पुन्हा एकदा नवी ऊर्जा देणे आहे.तुमचेही आयुष्य आज धावपळीत चालले असेल, तर थांबवून जुन्या मित्रांचा शोध घ्या. शाळेच्या त्या बाकांना आणि जुन्या मित्रांना एकदा नक्की भेटा. आयुष्याच्या शेवटी हीच निखळ मैत्री आणि या आठवणी तुमच्या चेहऱ्यावर हसू आणतील. आजच आपल्या शाळेची एक 'रियुनियन' आखा आणि मैत्रीचा हा रेशमी धागा आयुष्यभरासाठी जपून ठेवा !.

### सुटलेला हात आणि अधुरी उणीव...

६० विद्यार्थ्यांच्या या वर्गात आज आनंदाला उधाण आले होते, पण मनात एक खोल हुरहूरही होती. कोरोना आणि आरोग्याच्या कारणांमुळे चार वर्गमित्र आज या जगात नव्हते. ज्या शिक्षकांनी आयुष्याला घडवले, ते गुरूही आज देवाघरी गेले होते. या साऱ्यांच्या आठवणींनी गळा भरून आला. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत जुन्या आठवणींची उजळणी झाली. कालपर्यंत वर्गात गणिताचे कच्चे असलेले विद्यार्थी आज आयुष्याच्या गणितात पक्क्या नोकरीवर स्थिरावले आहेत; पण ५० च्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या प्रत्येकाने एका गोष्टीवर शिक्कामोर्तब केले—वय वाढलं, हुद्दे वाढले, पण आयुष्यातील धावपळ आणि अस्थिरता अजूनही तीच आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी अकोला अर्बन बँकेचा स्तुत्य उपक्रम

## एकाच वेळी शहरातील तीन ठिकाणी 1000 कापडी पिशव्यांचे वाटप

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अकोला :** पर्यावरण संवर्धन आणि प्लास्टिकमुक्तीचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला वतीने शहरातील नागरिकांना १००० कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

शहरातील श्रीवास्तव चौक, अॅड. मुंगी यांच्या कार्यालयासमोर, जठारपेठ आणि तुकाराम चौक या तीन ठिकाणी एकाच वेळी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. नागरिकांना प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर टाळून पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन यावेळी करण्यात





आले.

या उपक्रमाला बँकेचे अध्यक्ष शंतनू जोशी सपत्निक उपस्थित होते. तसेच बँकेचे उपाध्यक्ष राहुल राठी, संचालक राहुल गोयनका, कैलास मशानकर यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह पर्यावरण संरक्षण गतीविधीचे कार्यकर्ते उपस्थित होते. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. दैनंदिन जीवनात प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारल्यास पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना मिळू शकते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. प्लास्टिकला नकार, कापडी पिशवीचा स्वीकार; पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाचा सहभाग! या संदेशाने अकोला अर्बन बँकेच्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक आदर्श निर्माण केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट संमिश्र
सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# चांदूर रेल्वे परिसरातील सोलर प्लांट केबल चोरी टोळीचा पर्दाफाश

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अमरावती:** चांदूर रेल्वे परिसरातील सोलर प्लांट केबल चोरी टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी शेतकयांचे शेतातुन पानबुडी मोटर पंप व केबल चोरीचे प्रमाण वाढत असल्याने स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामिण येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करून कारवाई करण्याबाबत सुचना निर्गमीत केल्या होत्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा (LCB) अमरावती ग्रामीणच्या पथकाने धडक कारवाई करत चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे आणि कुन्हा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोलर प्लांट व शेतातील केबल चोरी करणाऱ्या आंतर-जिल्हा टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चोरीचा केबल जाळून तांबे विकत घेणाऱ्या २ भंगार विक्रेत्यांसह 2 आरोपींना अटक करण्यात आली असून, २ आरोपी फरार आहेत. आरोपींकडून चोरी चा केबल जाळून काढलेले तांबे, वाहने आणि मोबाईल असा एकूण ६,९१,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### तपासात मिळालेले यश व चोरीची कबुली

सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना, पथकाने संशयावरून आरोपी रुतेश मनचरण भोसले रातरोडा, चांदुर रेल्वे याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे आणि कुन्हा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोलर प्लांट व शेतातून केबल चोरी केल्याची कबुली दिली. चोरी केलेला केबल जाळून त्यातील तांब्याची तार अमरावतीच्या भंगार विक्रेत्यांना विकल्याचे आरोपीने निष्पन्न केले.

ग्राम सोनगाव (ता. चांदूर रेल्वे) येथील सोलर प्लांटवर दिनांक ७ ऑगस्ट २०२६ च्या रात्री ८:०० ते ८ ऑगस्ट २०२६ च्या सकाळी ६:०० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी धाड टाकून सुमारे २,३०,००० रुपये किमतीचे लाल-काळ्या रंगाचे केबल, डी.सी. केबल आणि केबल हॉरनेस वायर चोरी केले होते. याप्रकरणी कंपनीचे इलेक्ट्रिकल इंजिनिअर सहदेवराव रामराव चौधरी (वय ३६, रा. चांदूर रेल्वे) यांच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे चांदूर रेल्वे येथे अप.क्र.२९८/२६ कलम ३०३ (२) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. जप्त केलेला मुद्देमाल (एकूण किंमतः १६,९१,२००/-) तांबे धातू केबलः १४० किलो (किंमत ₹२,१०,०००/-) , वाहनेः गुन्ह्यात वापरलेल्या ४ मोटारसायकल (किंमत ₹२,३०,०००/-) व १ तीनचाकी टेम्पो (किंमत १२,००,०००/-), मोबाईल: ३ अँड्रॉइड मोबाईल फोन (किंमत ₹३२,०००/-) इतरः केबल चोरीसाठी वापरलेले साहित्य. उघडकीस आलेले ५ गुन्हे या कारवाईमुळे परिसरातील एकूण ५ मोठे गुन्हे उघडकीस आले आहेतः यामध्ये रुतेश मनचरण भोसले (वय २५, रा. तरोडा, चांदूर रेल्वे), अश्विन सुरेंद्र भोसले (वय २२, रा. शिवाजी नगर, चांदूर रेल्वे), फैजान शहा रहमत शहा (वय २०, रा. बिस्मिल्ला नगर, अमरावती भंगारवाला), अफान खान इरफान खान (वय १९, रा. गुलिस्ता नगर, अमरावती भंगारवाला), राहुल सुंभर भोसले (वय २५) ६) सुंभर सनातन भोसले (वय ४८, दोघे रा. राजीव गांधी नगर, चांदूर रेल्वे) सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड सा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मा. अशोक लांडे सा यांच्या नेतृत्वात पार पडली. पथकः PSI रोहित कुदळे, ASI मनोज चचेरे, पोलीस अंमलदार गजेंद्र ठाकरे आणि चालक ASI संजय प्रधान यांनी ही कामगिरी बजावली.

# अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक लिमिटेड मुख्य शाखा येथे स्वातंत्र्यदिन सोहळा थाटात

### भारताच्या 80 व्या स्वातंत्र्य दिन निमित्त आमदार सुलभाताई खोडके यांनी दिल्या शुभेच्छा



प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अमरावती:** १५ ऑगस्ट हा दिवस प्रत्येक भारतीयांसाठी सन्मानाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांनी आणि क्रांतिकारकांनी आपला देश ब्रिटिश साम्राज्यातून आपला जीव धोक्यात घालून मुक्त केला आणि त्यांच्या बलिदानाने देशाला स्वातंत्र्यप्राप्ती झाली आहे. म्हणूनच त्यांच्या स्मरणार्थ आणि आदर म्हणून स्वातंत्र्य दिवस प्रत्येक भारतीय व्यक्ती ऐतिहासिक रित्या साजरा करत आहे. याच शृंखलेत जवाहर रोड स्थित अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक लिमिटेड, अमरावती येथे स्वातंत्र्य दिन सोहोळ्याचे आयोजन करण्यात आले. अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक लिमिटेड, अमरावती अध्यक्ष- आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तद्नंतर सर्व उपस्थितांनी सामूहिक राष्ट्रगीत सादर करून राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पण केली. यावेळी जिल्हा महिला बँकेच्या संचालिका-पुष्पाताई गावंडे, अंजली चौधरी, संजीवनी देशमुख, मंदाकिनी बागडे, प्रा.डॉ. ज्योती धोपटे, आश्विनी भेटाळू, बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी-ऋषिकेश भामोदकर आदी उपस्थित होते. स्वातंत्र्यदिना निमित्य उपस्थितांना संबोधित करतांना आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले कि भारतीय स्वातंत्र्याला ८० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारक, स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात राहावी. या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी आपण सर्वांनी मागील काळत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशभरात आनंदाने आणि उत्साहात साजरा केला.

# 18 ऑगस्ट रोजी शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**अमरावती :** संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) अमरावतीच्या एनएसएस हॉल मध्ये येत्या 18 ऑगस्ट रोजी सकाळी 10 वाजता जिल्ह्यातील सर्व आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात पुणे जिल्ह्याच्या बारामती येथील पिआजिओ वेहिकल्स प्रा.लि. कंपनी तर्फे भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व आयटीआयमधील फिटर, वेल्डर,पेंटर, सीट मेटल वर्कर अभ्यासक्रम उत्तीर्ण सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी बायोडेटा व मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून यासंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपसंचालक तथा मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार यांनी केले आहे.

# मलकापुरात उत्साहात पार पडली ‘वृक्ष दिंडी’ व ‘जागर राष्ट्रभक्तीचा’ कार्यक्रम

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**मलकापूर:** देशाच्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मलकापूर येथे वृक्ष लागवड, संवर्धन, पर्यावरण रक्षण आणि देशभक्तीचा संदेश देणाऱ्या विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. ‘श्री छत्रपती शिवराय प्रतिष्ठान’ आणि ‘भातृ मंडळ, मलकापूर’ यांच्या संयुक्त विद्यमाने हे उपक्रम राबवण्यात आले.

**वृक्ष दिंडी सोहळा**

स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४:०० वाजता



श्री छत्रपती शिवराय प्रतिष्ठान येथून भव्य ‘वृक्ष दिंडी सोहळ्या’स सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या दिंडीचा सांगता समारोप सायंकाळी ६:०० वाजता भ्रातृ मंडळ, मलकापूर येथे करण्यात आला.

**‘जागर राष्ट्रभक्तीचा’ संगीतमय कार्यक्रम**

दिंडीच्या समारोपानंतर सायंकाळी ७:३० ते ९:३० या वेळेत ‘जागर राष्ट्रभक्तीचा’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन पार पडले. देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीने प्रेरित गीतांचा हा बहारदार कार्यक्रम ‘स्वरमाला मेलोडीज, अकोला’च्या कलाकारांनी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

**जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांची अनुपस्थिती**

या सोहळ्याचे उद्घाटन जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. प्रविणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते आणि अध्यक्षस्थान बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री. निलेशजी तांबे (IPS) यांच्या उपस्थितीत नियोजित होते. मात्र, बुलढाणा येथे पालकमंत्री यांच्या शासकीय कार्यक्रमात दोघांचीही उपस्थिती अनिवार्य असल्याने, शासकीय कामकाजानिमित्त ते मलकापूर येथील या कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत.

कार्यक्रमास तालुक्यातील अ‍ॅड.साहेबराव मोरे, अ‍ॅड हरीष रावळ,अनिल गांधी,

संतोष रायपुरे,शिवचंद्र तायडे

डॉ. अरविंद कोलते, दामोधर शर्मा, ज्ञानदेव हिवाळे, विशाल दवे, सुरेश शर्मा,रिटायर मेजर सर्व, आशाताई फरतोडे,

मंगलाताई पाटील, सर्व पर्यावरणप्रेमी, वृक्षमित्र, देशप्रेमी नागरिक, महिला व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. आयोजनाच्या यशस्वीतेसाठी ‘श्री छत्रपती शिवराय प्रतिष्ठान’ आणि ‘भातृ मंडळ, मलकापूर’च्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# नांदुरा उड्डाणपुलाला जाहीर पाठिंबा; मात्र शहराबाहेरून मार्ग काढण्याची मागणी

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**नांदुरा :** प्रस्तावित नांदुरा उड्डाणपुलाला नागरिकांचा जाहीर पाठिंबा असून, उड्डाणपुलाचा मार्ग शहराच्या मुख्य वस्तीमधून न काढता शहराबाहेरून पर्यायी मार्गाने करण्यात यावा, अशी ठाम मागणी नागरिक हक्क संरक्षण समितीच्या वतीने करण्यात आली. या मागणीसाठी समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, दुकानदार आणि नागरिक अशा सुमारे ७५ जणांच्या शिष्टमंडळाने शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी रावेर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार तथा केंद्रीय मंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांचे मुक्ताईनगर जि. जळगांव येथे जाऊन भेट घेतली व सविस्तर चर्चा केली तसेच आपल्या मागणीचे निवेदन सादर केले.



नांदुरा शहरातील प्रस्तावित उड्डाणपुलामुळे वाहतूक व्यवस्था, शहरातील व्यापारी व्यवहार, दुकाने तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर भविष्यात होणाऱ्या संभाव्य परिणामांची माहिती शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री रक्षाताई खडसे यांना दिली. उड्डाणपुलाला विरोध नसून, शहराचा भविष्यातील विकास, व्यापारी हितसंबंध आणि नागरिकांची सोय लक्षात घेऊन त्याचा मार्ग निश्चित करण्यात यावा, अशी समितीची भूमिका यावेळी स्पष्ट करण्यात आली.

शिष्टमंडळाने शहराबाहेरून पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. तसेच मुख्य बाजारपेठेतील व्यापारी आणि दुकानदारांचे व्यवसाय बाधित होणार नाहीत आणि नागरिकांचे दैनंदिन व्यवहारही अधिक सुरळीत राहतील, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

केंद्रीय मंत्री रक्षाताई खडसे यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले. प्रस्तावित उड्डाणपुलाची सद्यस्थिती, आराखडा आणि पर्यायी मार्गाच्या शक्यतेबाबत राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या मागणीची तातडीने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

या बैठकीत प्रस्तावित उड्डाणपुलाचा आराखडा, शहराबाहेरून पर्यायी मार्गाची व्यवहार्यता तसेच नागरिक व व्यापारी वर्गाच्या हिताचा विचार करून पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# श्रीं'च्या पालखीच्या आगमनासाठी संतनगरी सज्ज!

### 19 ऑगस्टला आगमन; मार्गावरही स्वागताची तयारी

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**शेगाव :** महाराष्ट्रासह देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत गजानन महाराजांची पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी दर्शनाची वारी पूर्ण झाली असून, श्रींची पालखी येत्या १९ ऑगस्ट रोजी संतनगरी शेगावमध्ये स्वगृही परतणार आहे. पालखीच्या आगमनाला अवघे काही दिवस उरल्याने शेगावसह पालखी मार्गावरील गावांमध्ये स्वागताची जय्यत तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे संतनगरीत आतापासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.



पालखीच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने वाटिका परिसरात मंडप उभारणीसह भाविकांसाठी आवश्यक सुविधांची तयारी सुरू आहे. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन निवारा, पिण्याचे पाणी, दर्शन व्यवस्था व अन्य मूलभूत सुविधांचे नियोजन करण्यात येत आहे. नगरपरिषद, पोलिस प्रशासन, संस्थान तसेच सेवाभावी संस्था पालखी सोहळा सुरळीतपणे पार पडण्यासाठी तयारीला लागल्या आहेत. भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, वाहतुकीची कोंडी टाळता यावी व पालखीचे दर्शन व्यवस्थित घेता यावे, यासाठी विविध पातळ्यांवर नियोजन केले

# सावळी येथे जुगारावर छापा; 9 जण ताब्यात

**नांदुरा:** पोलिसांनी मलकापूर तालुक्यातील सावळी येथे वरखेडकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सुरू असलेल्या जुगार अड्डयावर १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी छापा टाकून नऊ जणांना ताब्यात घेतले. कारवाईत रोख रक्कम, मोबाइल, ताशपत्ते व तीन दुचाकी असा एकूण १ लाख ४८ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुप्त माहितीच्या आधारे दोन पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईत सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळताना व खेळविताना आरोपी आढळल्याचे पोलिसांनी नमूद केले. यावेळी ४३ हजार १०० रुपये रोख, सुमारे ४० हजार रुपये किमतीचे मोबाइल, ताशपत्ते व तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी सैयद निजाम सैयद उस्मान, रामेश्वर नारायण तायडे, शांताराम गोपाल नेमाडे, कैलास दौलत तायडे, दीपक पुंडलीक खिरोडकर, मिलिंदसिंग भगतसिंग राजपूत, शेख याकुब शेख रौफ, सुभाषसिंग काशीरामसिंग खांबरे, शेख गरीब शेख अयुब यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्याद पो. उपनि. विलास थुल यांनी दिली. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही महिला पोलिस कर्मचारी सरोदे यांनी केली. पुढील तपास चिखलकर करीत आहेत.

# आजाराला कंटाळून वृद्धाची आत्महत्या

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**खामगाव:** तालुक्यातील पारखेड येथे आजाराला कंटाळून एका ८७ वर्षीय वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १५ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शालीग्राम गोविंदा गायकवाड (८७, रा. पारखेड, ता. खामगाव) असे मृत वृद्धाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचे नातू प्रशिक सुभाष गायकवाड (३०, रा. पारखेड) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, शालीग्राम गायकवाड हे मागील चार महिन्यांपासून कर्करोगाने त्रस्त होते. त्यांच्यावर अकोल्याला उपचार सुरू होते; मात्र उपचारानंतरही त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा होत नव्हती. त्यामुळे ते आजारपणाला कंटाळले होते, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. १५ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास ते राहत्या घरी एकटे असताना त्यांनी घरात

गळफास घेत आत्महत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेची माहिती मिळताच खामगाव ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# घंटागाडी कामगारांचे तिसऱ्या दिवशीही उपोषण सुरूच!

### मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**खामगाव :** विविध प्रलंबित मागण्यांकडे नगरपरिषद प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करत घंटागाडी कामगारांनी नगरपरिषद कार्यालयासमोर सुरू केलेले बेमुदत उपोषण रविवार, १६ ऑगस्ट रोजी तिसऱ्या दिवशीही सुरूच होते. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा आंदोलकांनी व्यक्त केला आहे. निर्धार

यापूर्वी कामगार प्रतिनिधी विनोद इंगळे यांनी मुख्याधिकारी तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून विविध मागण्यांची पूर्तता करण्याची मागणी केली होती. त्यानंतर प्रशासनाला स्मरणपत्रही देण्यात आले;

अशा आहेत प्रमुख मागण्या

मात्र याकडे गांभीर्याने लक्ष देण्यात आले नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. कामगारांच्या निवेदनानुसार, घंटागाडी कामगारांवर मुख्याधिकाऱ्यांनी अन्याय केल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून त्यांना तातडीने निलंबित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

बंद असलेल्या १३ घंटागाड्या त्वरित सुरू कराव्यात, कामावरून कमी करण्यात आलेल्या २६ कामगारांना पुन्हा सेवेत घ्यावे आणि त्यांचे थकीत वेतन अदा करावे, अशा प्रमुख मागण्याही करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात विनोद इंगळे, विक्की शिंदे, अमोल गवई, निखिल मांगले, सूर्यकांत खंडारे, गणेश महाले आणि अश्विन माने यांचा सहभाग आहे. कामगारांनी प्रशासनाला १३ ऑगस्टपर्यंत मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी मुदत दिली होती. अन्यथा १४ ऑगस्टपासून बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र, कार्यवाही न झाल्याने कामगारांनी उपोषण सुरू केले.

# निवेदन 13 ला, उत्तर 14 ला; कारवाईपेक्षा कागदी पत्रव्यवहारालाच तहसिलदारांचे प्राधान्य?

### दहा मागण्यांची पारदर्शक चौकशी अवघ्या एका दिवसात? तहसीलदारांच्या उत्तराने नव्या प्रश्नांना तोंड फुटले

प्रतिनिधी १७ ऑगस्ट

**मलकापुर:** अस्तित्व संघटनेच्या अध्यक्षा प्रेमलताताई सोनोने यांनी 13 ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयातील प्रतिज्ञापत्रावरील सहीच्या कामकाजासह दीर्घकाळची पदस्थापना, बदलीनंतरची पुनर्पदस्थापना व प्रशासकीय अधिकाराच्या वापराबाबत सविस्तर निवेदन दिले. त्यावर तहसीलदार कार्यालयाने 14 ऑगस्ट रोजी उत्तर दिल्याने, एवढ्या गंभीर व विविध स्वरूपाच्या मागण्यांची प्रत्यक्ष चौकशी, कागदोपत्री पडताळणी आणि सत्यता तपासणी अवघ्या एका दिवसात झाली तरी कशी? असा सवाल आता उपस्थित झाला आहे.

प्रेमलता सोनवणे यांच्या निवेदनात प्रतिज्ञापत्रावर सही करण्यासाठी अधिकृत असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी व प्राधिकृतीकरण आदेश, संबंधित कर्मचाऱ्यांचा मलकापूरमधील सेवा कालावधी, बदलीनंतर पुन्हा झालेल्या पदस्थापनेचे आदेश व त्यामागील प्रशासकीय कारणे, दीर्घकाळच्या पदस्थापनेचा आढावा तसेच नागरिकांना सहीसाठी होणाऱ्या कथित हेलपाट्यांची चौकशी अशा दहा मुद्द्यांवर स्पष्ट कार्यवाहीची मागणी करण्यात आली होती.

तहसीलदारांच्या 14 ऑगस्टच्या उत्तरात नागरिकांना अनावश्यक हेलपाटे लागू नयेत यासाठी दक्षता घेण्यात येईल आणि तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 नुसार कार्यवाही करता येईल, असे नमूद आहे.

मात्र येथेच मुख्य प्रश्न उभा राहतो. तक्रारींची प्रत्यक्ष चौकशी झाली का? संबंधित कर्मचाऱ्यांचे म्हणणे घेण्यात आले का? सेवा अभिलेख तपासण्यात आले का? बदली व पुनर्पदस्थापनेचे आदेश पडताळण्यात आले का? नागरिकांच्या तक्रारींची सत्यता तपासण्यात आली का? या प्रश्नांची ठोस उत्तरे तहसीलदारांच्या पत्रातून स्पष्ट होत नाहीत. विशेष म्हणजे प्रतिज्ञापत्र व शपथपत्रावरील स्वाक्षरीच्या व्यवस्थेबाबत तहसील प्रशासनाने सन 2024 मधील जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश तसेच तहसील कार्यालयीन आदेशाचा आधार घेतला आहे. परंतु 2026 मध्ये हीच व्यवस्था कोणत्या विद्यमान आदेशाच्या आधारे सुरू आहे, याची स्पष्टता आवश्यक आहे.

दीर्घकाळची पदस्थापना आणि बदलीनंतर पुन्हा मलकापूर महसूल विभागात झालेली पदस्थापना या मूळ मागण्यांवरही संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती तारीख, बदली आदेश, पुनर्पदस्थापनेचे आदेश व प्रशासकीय कारणे याबाबत स्पष्ट माहिती उत्तरात दिसत नाही.त्यामुळे तहसीलदारांचे उत्तर चुकीचे आहे, असा थेट आरोप करण्याऐवजी एक साधा पण गंभीर प्रश्न प्रशासनासमोर उभा राहतो 13 ऑगस्टच्या निवेदनातील दहा मागण्यांची पूर्ण पडताळणी करून 14 ऑगस्टला उत्तर देण्यात आले असेल, तर त्या चौकशीची कागदोपत्री नोंद कुठे आहे?

# 15 जिल्ह्यात ओबीसी सरपंचपदाच्या जागांना फटका!

## 500 हून अधिक जागा खुल्या प्रवर्गात; सुधारित आदेश जारी!

प्रतिनिधी १७ऑगस्ट

**अकोला :** आता ओबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५०० जागा या खुल्या प्रवर्गात वर्ग करण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आरक्षण ५० टक्केच्या मर्यादित ठेवण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाकडून काढण्यात आला. त्यानंतर ग्राम विकास विभागाने ओबीसीच्या सरपंचपदाबाबतचे सुधारित आदेश काढले आहेत. याचा फटका अकोल्यासह अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, अशा १५ जिल्ह्यातील ओबीसीच्या ५०० जागांना बसणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींच्या आरक्षणाचा मुद्दा निकाली काढल्यानंतर शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे जाहीर केले.

नगर पंचायत, नगरपालिका, महापालिका आणि जिल्हा परिषदांसोबत ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये ओबीसीसाठी २७ टक्के आरक्षणानुसार जागा निश्चित करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले होते. त्यामुळे काही महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत, जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींत आरक्षण हे ५० टक्क्यांवर गेले. राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचातींतील जागा ५० टक्केच्या मर्यादित आरक्षित ठेवण्याचे ३० एप्रिल २०२६ आदेश काढलेत. त्यामुळे सरपंचपदासाठी आरक्षित पदांची संख्या पूर्वीच्या तुलनेत ५१२ ने कमी झाली असून खुल्या वर्गातील पदे वाढवण्यात आली.

»राज्य निवडणूक आयोगाने १३ जून २०२५ रोजी आरक्षण निश्चित करण्याबाबतची अधिसूचना काढली होती. यानुसार १५ जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये ओबीसीकरिता सरपंचपदासाठी ६७१९ जागा आरक्षित होत्या. आता राज्य निवडणूक आयोगाने ३० एप्रिलला आरक्षित जागांबाबत नव्याने आदेश काढलेत. त्यामुळे आता ओबीसीसाठी आरक्षित करण्यात येणाऱ्या सरपंचपदाची संख्या कमी करण्यात झाली आहे. आता ६२०७ जागा ओबीसीसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. यातील ३१११ जागा या महिलांसाठी राखीव, खुल्या वर्गासाठी १३५८९ तर ६८०३ पदे महिलांसाठी राखीव असतील. हा सुधारित आदेश धुळे, जळगाव, हिंगोली, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा यांना लागू राहील.

# डाळिंबीजवळ रॉयल ढाब्याला भीषण आग

प्रतिनिधी १७ऑगस्ट



**अकोला :** अकोला-मूर्तीजापूर राष्ट्रीय महामार्गावरील डाळिंबी गावाजवळ असलेल्या 'रॉयल धाबा' आणि एका मिनी टँकरला रविवारी (१६ ऑगस्ट) रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास भीषण आग लागली.

या दुर्दैवी घटनेत मिनी टँकरसह संपूर्ण धाबा जळून खाक झाला असून मोठे नुकसान झाले आहे. अवैध इंधनातून ही आग लागल्याची माहिती समोर येत आहे.

या प्रकरणात पोलिसांनी कठोर कारवाई करण्याची गरज असून जिल्ह्यातील इतर ही अवैध इंधन विक्रेते व पुरवठादार यांच्यावर कडक कारवाईची गरज व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महामार्गा लगतच्या रॉयल धाब्याजवळ एका वाहनामध्ये डिझेल भरण्याचे काम सुरू असताना अचानक ठिणगी पडल्याने आगीचा भडका उडाला. काही क्षणांतच या आगीने अत्यंत रौद्ररूप धारण केले आणि आगीच्या ज्वालांनी मिनी टँकर व संपूर्ण धाब्याला कचाट्यात घेतले. घटनेची माहिती मिळताच बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग नियंत्रणात आणण्याचे शर्थीचे प्रयत्न केले.

### पालकमंत्र्यांनी केली
# म्हैसपूर गोसेवा प्रकल्पाची पाहणी

प्रतिनिधी १७ऑगस्ट

**अकोला :** राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज म्हैसपूर येथील आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाला भेट देऊन तेथील विविध उपक्रमांची पाहणी केली.

संस्थेचे सचिव प्रा. विवेक बिडवई, संघाचे प्रांत सरकार्यवाह अजय नवघरे यांच्यासह अधिकारी व विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. फुंडकर यांनी सप्तगौ परिक्रमा मंदिराला भेट देऊन गौपूजन केले. त्यानंतर त्यांनी गोशाळेची पाहणी केली.

तेथील धन्वंतरीभवन औषधे निर्मिती केंद्र आणि खत निर्मिती केंद्रालाही त्यांनी भेट दिली. त्याठिकाणी सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी जाणून घेतली.










हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135